सांकेतांक 2018010322 NO2018010322

(29) 369 269 2e3

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ४, अंक २(३)] बुधवार, जानेवारी ३, २०१८/पौष १३, शके १९३९ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ७

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ जानेवारी २०१८

**अधिसूचना**

**महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७.**

क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र. ३४७(एक)/ल-१.—महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम (सन १९४७ चा ६२) याच्या कलम ९ च्या पोट-कलम (३) खालील प्रथम परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे, सदर अधिनियमातील कलम ९ च्या पोट-कलम (३) च्या स्पष्टीकरणात परिभाषित करण्यात आलेल्या वार्षिक दर पत्रकातील अशा जमिनीच्या बाजारमुल्याच्या २५ टक्के इतके नियमाधीनकरण अधिमूल्य अधिसूचित करत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

डॉ. संतोष भोगले,
शासनाचे उप सचिव.



S-15

23 ~~2A~~-368 ~~263~~ 2e4

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, Dated the 2nd January 2018.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PREVENTION OF FRAGMENTATION AND CONSOLIDATION OF HOLDINGS ACT.

No. Misc. 2016/C. R. 347(I)/L-1.—In exercise of the powers conferred by the first proviso to sub-section (*3*) of section 9 of the Maharashtra Prevention of Fragmentation and Consolidation of Holdings Act (LXII of 1947), the Government of Maharashtra hereby notifies the regularization premium at 25 per cent. of the market value of the land as per the Annual Statement of Rates as defined in the Explanation to sub-section (*3*) of section 9 of the said Act.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. SANTOSH BHOGLE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

S-16

७८ २८८ प्री-३६१ २६५

ई-मेलने

महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण-२०१६/ प्र.क्र.३४७/ल-१
महसूल व वन विभाग, मुख्य इमारत,
पहिला मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई- ४०० ०३२
दिनांक- ९ जानेवारी, २०१८

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त,
जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व जिल्हाधिकारी / अप्पर जिल्हाधिकारी
सर्व सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी
सर्व उपविभागीय अधिकारी / तहसिलदार

**विषय** :- महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

**संदर्भ** :- शासनपत्र समक्रमांक दि.२६ ऑक्टोबर, २०१७ चे पत्रे

"महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २०१७" हा महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये दिनांक ७ सप्टेंबर, २०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आला असून सदर शासन राजपत्राची मराठी व इंग्रजी भाषेतील प्रत माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेली आहे.

२. आता महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २०१७, मधील तरतूदीन्वये आकारावयाचे नियमाधीकरण अधिमूल्य निश्चित करण्यात आले असून त्यासंदर्भातील दिनांक ३ जानेवारी, २०१८ च्या महाराष्ट्र शासन राजपत्राची मराठी व इंग्रजी भाषेतील प्रत माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

सहपत्र : वरीलप्रमाणे

(विथोरात)

**(विलास थोरात)**
**अवर सचिव**

प्रत :-

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
२. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
३. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
६. प्रधान सचिव (महसूल) यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व सह सचिव / उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. ज समूहातील सर्व कार्यासने, कार्यासन म-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. निवडनस्ती- ल-१

S-14